# सोलापूर जनता सहकारी बँक लि.
# Solapur Janata Sahakari Bank Ltd.

SJSB Multi-State Scheduled Coop.Bank

मल्टी-स्टेट शेड्युल्ड को.ऑप.बँक  Multi-State Scheduled Coop. Bank

(Reg.No.MSCS/CR/1007/2014)

## 61 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
**(केवळ सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना सूचित करण्यात येते की, सोलापूर जनता सहकारी बँक लि., सोलापूर या बँकेची 61 वी वार्षिक सर्वसाधारण **सभा गुरुवार दि. 03-09-2026 रोजी दुपारी 02.00 वाजता हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर** (महाराष्ट्र) 413001 या ठिकाणी खालील विषयावर निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

1. बँकेच्या दि. 25-07-2025 च्या 60 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. आर्थिक वर्ष 2025-26 चा वार्षिक अहवाल, नफा तोटा पत्रक, दि. 31-03-2026 चे वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेले ताळेबंद पत्रकाची नोंद घेणे.
3. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या आर्थिक वर्ष 2025-26 च्या नफा विभागणीची नोंद घेणे व त्यास मंजुरी देणे.
4. मागील वर्षाच्या ( 2024-25 ) वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालास स्वीकृती देणे.
5. सी. ए. शशांक पत्की अँड असोसिएट्स यांनी केलेल्या आर्थिक वर्ष 2025-26 च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
6. मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या आर्थिक वर्ष 2026-27 च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व आर्थिक वर्ष 2025-26 च्या अंदाजापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
7. आर्थिक वर्ष 2026-27 साठी मा. वैधानिक लेखापरीक्षकांची पुनर्नियुक्ती व मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. RBI च्या पूर्वमंजुरीने संचालक मंडळास देणे.
8. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002, कलम 39 ( 3 ) नुसार, बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची व त्यांच्या दि. 31-03-2026 रोजी असलेल्या येणेबाकीची माहिती घेणे.
9. संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक सेवक यांची माहिती घेणे.
10. धर्मादाय / सार्वजनिक कारणासाठी धर्मादाय निधीतून संस्थांना देण्यात येणारे देणगी बाबतचे प्रस्तावास मान्यता देणे विषयीचे अधिकार मा. संचालक मंडळास देणेबाबत.
11. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम 2002, मधील तरतुदीस अनुसरून मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
12. या 61 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या गैरहजेरीस मान्यता देणे.
13. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**स्थळ : सोलापूर**
रजिस्टर ऑफिस- **सोलापूर जनता सहकारी बँक लि. सोलापूर**
''गगन भरारी'', शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर
दिनांक : **19 ऑगस्ट 2026**

मा. संचालक मंडळाचे आज्ञेवरून,
**विनय दुनाखे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :- सभेसाठी निश्चित केलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत जर गणसंख्या पूर्ती झाली नाही तर सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित सभा त्याच दिवशी त्याच स्थळी, दुपारी 2 वाजून 40 मिनिटांनी घेतली जाईल. या स्थगित सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता असणार नाही.**

---

### सभासदांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. आर्थिक वर्ष 2025-26 चा बँकेचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक, आपल्या बँकेच्या **www.sjsb.bank.in** या संकेत स्थळावर पाहता येईल. तसेच दि. 19-08-2026 रोजी अथवा त्यानंतर बँकेचा अहवाल आपल्या नित्याच्या शाखेत उपलब्ध करून देण्यात येईल.

२. सभासदांच्या नांव, निवास- पत्ता किंवा वारसदार यांच्यामध्ये बदल झाला असल्यास, त्यांनी आपल्या नित्याच्या शाखेत किंवा मुख्य कार्यालयातील बोर्ड सचिवालय विभागास लेखी कळवावे.

३. रिझर्व्ह बँकेने सर्वच खात्यांना वारस नोंद करणे व KYC अपडेट करणे अनिवार्य केले आहे. तरी ज्या सभासदांचे आपल्या बँकेत खाते आहे, त्यांनी KYC ची पूर्तता व वारस नोंद करून घ्यावे तसेच आपल्या लॉकर खात्याचे करार नूतनीकरण करून घेण्यासाठी आपला अद्ययावत फोटो, आय डी प्रूफ, मोबाईल क्रमांक, ई -मेल व पत्त्याच्या पुराव्यासह पूर्तता करून घ्यावी.

४. ज्या सभासदांनी आर्थिक वर्ष 2023-24 व 2024-25 चा लाभांश अद्याप स्वीकारला नसेल, त्यांनी आपला लाभांश प्राप्त करावा. तसेच ज्या सभासदांनी आर्थिक वर्ष 2022-23 चा लाभांश अद्याप स्वीकारला नसेल त्यांनी दि. 30 डिसेंबर 2026 पर्यंत आपला लाभांश प्राप्त करावा, तद्नंतर अदा न झालेल्या लाभांशची पूर्ण रक्कम बँकेच्या पोटनियम क्र.52 (iv) नुसार बँकेच्या राखीव निधीमध्ये जमा करण्यात येईल.